<u>प्रेस नोट</u>

## सराईत चोरटयाकडुन चोरीची १९ वाहने जप्त हडपसर पोलीसांची कारवाई

मा.अपर पो.आयुक्त सो सुनिल फुलारी, पोलीस उप आयुक्त सो परि.४ श्री अक्कानुवर, मिलिंद पाटील सपोआ वानवडी, वपोनि सुनिल तांबे,पोनि गुन्हे कुंभार यांचे मार्गदर्शनाखाली तयार करण्यात आलेल्या विषेश वाहन चोरी पथकाने **दिनांक १२/०८/२०१८ रोजी सायंकाळी** हडपसर पोलीस स्टेशन हददीमध्ये पेट्रोलिंग दरम्यान दोन इसम हे म्हस्के हॉस्पीटल परीसरात पार्कींग मधील गाडयांना चाव्या लावुन पाहत असताना मिळुन आले. म्हणुन सदर संशयित इसमांना ताब्यात घेवुन त्यांची झडती घेतली असता त्यांचे खिश्या मध्ये विविध दुचाकी व चार चाकी गाडयांच्या चाव्या व स्क्रु ड्रायव्हर,पक्कड इत्यादी साहीत्य मिळाल्याने त्यांना लागलीच ताब्यात घेवुन पोलीस स्टेशन आणुन त्यांचे नाव पत्ता विचारता त्यांची त्यांची नावे १) हर्षवर्धन गौतम घोडके,वय –२५ वर्षे,रा मिरजगाव ता.कर्जत जि अहमदनगर.२) युवराज अर्जुन ढोणे वय २० वर्षे रा.मिरजगाव ता.कर्जत जि अहमदनगर असे सांगितले त्यांचेकडे हडपसर पोलीस स्टेशन हददीतुन चोरीस जाणाऱ्या वाहनांच्या अनुषंगाने करुन चौकशी केली असता त्यांनी हडपसर,पुणे शहर, पुणे ग्रामीण भागातुन दुचाकी व एक हडपसर येथुन चार चाकी चोरल्याचे कबुल केले. सदर आरोपींकडुन १८ **दुचाकी व १ (तवेरा कार ) चार चाकी असे एकुण १९ वाहने असा एकुण १०,१५,०००/-रु. (दहा लाख पंधरा हजार रु.) किंमतीचा अदांजे माल जप्त** करण्यात आलेली आहेत. सदर चोरीच्या वाहनांमध्ये हडपसर,दिघी, शिवाजी नगर,विश्रामबाग,मार्केटयार्ड, करमाळा, बार्शी, पंढरपुर, टेंभुर्णी, अहमदनगर, इत्यादी पोलीस स्टेशन हददीतुन गाडया चोरल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. पुढील अधिक तपास चालु आहे.

सदर कारवाई हि **वपोनि सुनिल तांबे,पोलीस उप निरीक्षक मंगेश भांगे, पोहवा/पठाण, पोना/प्रताप गायकवाड, पोना विनोद शिवले, पोशि नितीन मुंढे, अकबर शेख,पोशि/नाळे** यांनी केली आहे.